# मार्चमध्ये एकाच वेळी सर्व ग्रहांना पाहण्याची संधी

**प्रतिनिधी**
नागपूर

दर दोन-तीन वर्षानंतर आकाशात ४-५ ग्रह दिसतात, पण एकाच रात्री सर्व ग्रह आकाशात फार कमी वेळा दिसून येतात. पुढील दोन महिन्यापर्यंत आकाशात सर्व ग्रह दिसणार आणि युरेनस, शुक्र, गुरू, मंगळ व शनी हे ठळकपणे साध्या डोळ्याने दिसणारे ग्रह या काळात चमकदार असणार आहेत, अशी माहिती सेंट्रल इंडिया स्काय वॉच ग्रुपतर्फे देण्यात आली आहे.



सूर्य मावळताच सूर्याजवळ बुध व नेपच्युन ग्रह असेल, पण सूर्याच्या प्रखर प्रकाशामुळे हे ग्रह दिसू शकणार नाहीत. सुर्यास्तानंतर पश्चिमेला ठळकपणे शुक्र ग्रह चकाकताना दिसेल. शुक्राच्या अगदी लागून युरेनस हा ग्रह दिसणार आहे. त्यामुळे त्याला शोधणे कठीण जाणार नाही. हे दोन्ही ग्रह ८.३० पर्यंत मावळतील. शुक्राच्या वरच्या बाजूला ठळकपणे चकाकणारा मोठा ग्रह गुरू असून दुर्बिणीतून पाहिल्यास गुरूचे ४ चंद्र आयो, कॅलिस्टो, गनिमेड व युरोपा दिसतात. हा ग्रह मीन राशीत आहे.

८.३० वाजता रात्री पूर्वेला सिंह राशीत मंगळ ग्रह उगवताना दिसेल. लाल रंगाचा हा ग्रह कुतूहलाचा ग्रह आहे. रात्री ११ वाजेनंतर पूर्वेला कन्या राशीत शनी ग्रह उगवेल व त्याला रात्रभर पाहता येईल. दुर्बिणीने शनीची सुंदर कडा पाहता येईल. त्यानंतर पहाटे ४ वाजता धनू राशीत प्लुटो ग्रह उगवेल, पण तो साध्या दुर्बिणीने सुद्धा दिसणार नाही. सध्या आकाशाच्या मध्यात चमकदार असे मृग नक्षत्र व चमकणारा व्याध तारा दिसेल. संध्याकाळपासून रात्रीपर्यंत सर्व ग्रह एकाच वेळेस आकाशात असण्याची ही दुर्मिळ संधी आहे. त्याचप्रमाणे डोळ्याने दिसणारे चमकदार ५ ग्रह एकाच वेळेस पाहण्याची संधी खगोलप्रेमींनी सोडू नये, असे आवाहन सेंट्रल इंडिया स्काय वॉच ग्रुपने केले आहे.

**Loksatta, Pune, February 17, 2012. Pp.4**